REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 9 | JUNE - 2023

# " हिंगणघाट तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळामधील शिक्षकांना देण्यात येणाऱ्या अशैक्षणिक कामाचा अध्यापन व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम : एक अभ्यास."

डॉ.जी..व्ही..जैन
माजी सहाय्यक प्राध्यापक, शिववैभव शिक्षण महाविद्यालय, वर्धा.



शिक्षण ही मानवाची मुलभुत गरज बनली आहे. या मुलभुत गरजांची पुर्तता करण्यासाठी शासन स्थरावर सुध्दा फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत. शासन विद्यार्थ्यासाठी व समाजासाठी विविध उपक्रम व योजना राबवून शिक्षणाचे सार्वत्रिकरण करत आहे.

"हिंगणघाट तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळामधील शिक्षकांना देण्यात येणाऱ्या अशैक्षणिक कामाचा अध्यापन व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणारा परीणाम : एक अभ्यास"

हा विषय निवडण्याच्या पाठीमागचे प्रमुख कारण म्हणजे हल्लीच्या काळामध्ये माध्यमिक शिक्षकांना अध्यापनाशिवाय विविध प्रकारची अशैक्षणिक कामे दिली जातात. उदा. पशुगणना, कुटूंब सर्वेक्षण, जनगणना, कुपोषित बालकांचे सर्वेक्षण, निवडणुका, स्वच्छता अभियान, दारीद्रय रेषेखालील कुटूंबाचे सर्वेक्षण, ग्रामशिक्षण समितीची बैठक, तांदुळ शिजवून वाटप करणे, पल्स पोलिओ लसीकरण, अपंग मुलांचे सर्वेक्षण, निवडणुक याद्या तयार करणे व दुरूस्ती करणे, ओळखपत्रे तयार करणे इ. अन्य प्रकारचे विविध अशैक्षणिक कार्य माध्यमिक शिक्षकांना करावी लागतात. परिणामी अध्यापनावर व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम होतो. म्हणजेच शिक्षकांना दैनंदिन असणाऱ्या अध्यापनावर व अध्यापनात या कामामुळे बाधा येत आहे. अशैक्षणिक कार्याच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांचे मानसिक संतुलन बिघडत आहे व ही कामे नकोसे वाटत असल्यामुळे कधी-कधी शासनाला बोगस अहवाल पाठविले जातात.

संशोधकाला हा विषय घेण्याच्या पाठीमागचे दुसरे कारण म्हणजे माध्यमिक शिक्षकांना कोणकोणत्या प्रकारची अशैक्षणिक कामे दिली जातात आणि त्यांचे अध्यापनावर आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर काय परिणाम होतात? याचा विस्तृतपणे शोध घ्यावा याच्या परिणामाचा शोध लावाला, त्यामुळे संशोधकाने वरील विषयाची निवड केली आहे. कारण या विषयाला सध्यस्थितीत अतिशय महत्व आहे.

शासन स्तरावर माध्यमिक शिक्षकांची अशैक्षणिक कामे कमी केल्याशिवाय अथवा पुर्णत: बंद केल्याशिवाय अध्यापण परिपुर्ण आणि दर्जेदार होणार नाही त्यामुळे शासनाने वेळीच दखल घेवून भविष्यातील होणारे दुष्परिणाम रोखण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. माझ्यापरीणे सर्वेक्षण पध्दतीने मी या विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न अगदी प्रामाणिकपणे करीत आहे म्हणूनच संत तुकाराम महाराज म्हणतात.

*असाध्य ते साध्य करीता सायास।।*
*कारण एक अभ्यास तुका म्हणे।।*

**समस्या विधान :-**

"हिंगणघाट तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळामधील शिक्षकांना देण्यात येणाऱ्या अशैक्षणिक कामाचा अध्यापन व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम : एक अभ्यास."

**कार्यात्मक व्याख्या :-**

**स्थानिक स्वराज्य संस्था -**

लॉर्ड रिपनने १२ मे १८८२ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थाची मुहूर्तमेळ रोवली, म्हणूनच त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक म्हणतात.

स्थानिक पातळीवर शासनसंस्था निर्माण करण्यात आल्या आहेत त्यांना स्थानिक संस्था म्हणतात.

*नागरीक शास्त्र, इयत्ता दहावी, पान नं. ३५.*

**माध्यमिक शाळा -**

स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत किंवा महाराष्ट्र शासनामार्फत इयत्ता ८ ते १० वी पर्यंत चालविल्या जाणाऱ्या शाळा म्हणजे माध्यमिक शाळा होय.

*शिक्षण संक्रमण, पान नं. ८.*

**माध्यमिक शिक्षण -**

प्राथमिक शिक्षण व विद्यापिठीय शिक्षण यांना जोडणारा दुवा म्हणजे माध्यमिक शिक्षण होय. *शालेय व्यवस्थापण, प्रा. नागरे.*

**कार्य -**

कार्य म्हणजे व्यक्तीचे शारीरिक व मानसिक प्रयत्न.

*Oxford English Dictionary.*

**शैक्षणिक कामे (कार्य) -**

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना अध्यापन व अध्यापनाशी निगडीत असलेली कामे उदा. वार्षिक नियोजन, घटक नियोजन, पाठटाचन, वार्षिक सराव परिक्षा, अभ्यासक्रमपुरक कार्यक्रम या सर्व कामाचा समावेश शैक्षणिक कामात होतो.

*शालेय व्यवस्थापन, अशैक्षणिक संरचना आणि आधुनिक प्रवाह, डॉ. सौ. किरण नाकतोडे.*

**अशैक्षणिक कामे (कार्य) -**

शिक्षकांला अध्यापनाशिवाय इतर ही प्रौढ शिक्षणाची कामे, कुटूंब कल्याण विषयक कामे, साक्षरतेची कामे, निवडणुकीची कामे, कुटूंब नियोजन कार्यक्रम, ग्रामशिक्षण मोहिम, जनगणना, शाळासुधार प्रण्यास कार्यक्रम, विविध अहवाल वरील कामे ही अशैक्षणिक कामात समावेशीत होतात.

*शालेय व्यवस्थापन, अशैक्षणिक संरचना आणि आधुनिक प्रवाह, डॉ. सौ. किरण नाकतोडे.*

### परस्पर संबंध –

एखाद्या विषयामध्ये बाबीमध्ये क्षमतामध्ये काही संबंध आहे का याचा शोध घेणे म्हणजेच परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

*मुल्यमापन व संस्थाशास्त्र, वा. ना. दांडेकर, पान नं. ३५.*

### अभ्यास –

अभ्यास या शब्दाची फोड अभि + आस अशी करता येईल. म्हणजेच  बसणे या संस्कृत शब्दाच्या अर्थावरून बसून शिकणे, सराव करणे.

*शैक्षणिक टिपा कोष, शं कृ. सोहनी, पा. नं. १२.*

### संशोधनाची उद्दिष्टये :-

१. माध्यमिक शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या शैक्षणिक कामाचा अभ्यास करणे.
२. माध्यमिक शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या अशैक्षणिक कामाचा अभ्यास करणे.
३. माध्यमिक शिक्षकांच्या अशैक्षणिक कार्याचा होणारा परिणाम याचा शोध घेणे.
४. माध्यमिक शिक्षकांचा अशैक्षणिक कामाचा गुणवत्तेवर होणारा परिणाम याचा शोध घेणे.
५. माध्यमिक शिक्षकांची शैक्षणिक व अशैक्षणिक कार्य याचा परिणाम संबंध तपासणे.

### न्यादर्श (Sampling):-

वर्धा जिल्हयातील एकूण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ७० शाळापैकी तालुक्यात २० शाळा आहेत. या २० शाळापैकी संशोधकाने ग्रामिण भागातील ३ व शहरी भागातील २ अश्या एकूण ५ शाळांची निवड केलेली आहे. तसेच १०० शिक्षकापैकी ४० शिक्षक हे संशोधनासाठीचे प्रतिसादक आहेत.

### न्यादर्शन पध्दती :-

संशोधकाने असंभाव्यता पध्दतीतील सप्रयोजन न्यादर्श पध्दतीचा वापर न्यादर्श निवडीसाठी केलेला आहे.

### संशोधनाची कार्यपध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी शालेय सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.  कारण आपली समस्या ही वर्तमानकाळात असणाऱ्या माध्यमिक शिक्षकांच्या समस्येशी निगडीत आहे यासाठी सर्वेक्षण पध्दतीची निवड संशोधनासाठी केली आहे.

### संशोधनाची साधने:-

संशोधकाने आपल्या संशोधनासाठी प्रश्नावली हे साधन निवडले आहे. संशोधकाने मुक्त प्रश्न व बध्दप्रश्न या दोन प्रश्न प्रकाराचा प्रश्नावलीत वापर केलेला आहे.

### माहिती संकलन/संशोधन कार्यवाही :-

संशोधकाने आपल्या संशोधनासाठी माहिती संकलन करण्यासाठी प्रश्नावली हे साधन निवडले आहे. प्रश्नावली ६ तज्ञाकडून तपासून घेतली. त्यामध्ये त्यांनी सांगितलेल्या सुचना लक्षात घेवून त्यामध्ये दुरूस्त्या केल्या व दुरूस्त्या केलेल्या ३० प्रश्नाचीं प्रश्नावली मुद्रीत करून हिंगणघाट तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमिक शाळेतील शिक्षकांना देवून आपल्या संशोधनासाठी

माहिती संकलित केली आहे. या माहितीच्या आधारे अर्थनिर्वचन, विश्लेषण आणि निष्कर्ष काढण्यासाठी संशोधकाने शेकडेवारी हे सांख्यिकिय परिमाण वापरले आहे.

## सांख्यिकिय परिमाणे :-

संशोधकाने प्रश्नावलीव्दारे माहिती मिळविली आहे व तिचे विश्लेषण करण्यासाठी सारणीकरण व शेकडेवारी हया संख्याशास्त्रीय किंवा सांखिकिय परिमाणाचा वापर केला आहे.

## माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

संशोधकाने प्रश्नावलीव्दारे माहिती मिळविली आहे. तिचे विश्लेषण करण्यासाठी सारणीकरण व शेकडेवारी ही संख्याशास्त्रीय पध्दती वापरली आहे.

## निष्कर्ष :-

१. हिंगणघाट तालुक्यातील मराठी माध्यमांचे माध्यमिक शिक्षक त्यांच्या अध्यापनाचे नियोजन करतात.
२. शिक्षक अध्यापनाशिवाय विद्यार्थ्यासाठी शाळेत विविध शैक्षणिक उपक्रम राबवितात.
३. शिक्षकाकडून विद्यार्थ्यासाठी विविध स्पर्धा, थोर नेत्यांच्या जयंत्या, शाब्दिक खेळ,चित्रकला स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, यासारखे उपक्रम राबविले जातात.
४. अशैक्षणिक कार्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.
५. जो वेळ शिक्षक विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी देतात त्यांचे दैनंदिन अध्यापन घेण्यासाठी, शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी देतात तो वेळ त्यांना अशैक्षणिक कामासाठी द्यावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता ढासळते.
६. अशैक्षणिक कार्यासाठी शिक्षक नसावेत असेच बऱ्याच शिक्षकांचे मत आहे.
७. शिक्षकांना निवडणुकीच्या कामासाठी नेमु नये. हया सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी शिक्षक सहमत आहेत.
८. अशैक्षणिक कामे सुशिक्षित बेरोजगारांना द्यावीत किंवा शाळेत लिपीक नेमुन कामे द्यावीत किंवा त्या-त्या विभागातील इतर कर्मचाऱ्यांना ही कामे द्यावीत उदा. तलाठी, ग्रामसेवक, कृषीसेवक इत्यादी.
९. शिक्षकांच्या मते, पुर्णत: अशैक्षणिक कामे बंद व्हावीत.
१०. अशैक्षणिक कामे बंद झाली तर शिक्षक अध्यापनाला वेळ देवू शकतील.
११. अशैक्षणिक कामे बंद झाल्यास अध्यापन सुरळीत होईल, असे शिक्षकांचे मत आहे.
१२. शिक्षकांच्या मते, ही कामे सुशिक्षित बेरोजगारांनी,अंशकालीन कर्मचाऱ्यांनी गावातील सुशिक्षित युवकांनी करावी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी अधिकारी, विविध सामाजिक संस्थानी करावी.
१३. शिक्षकांना करावी लागणारी शैक्षणिक कार्य व अशैक्षणिक कार्य यांचा परस्पर संबंध दिसून आला.

## संदर्भ ग्रंथ सूची :-

१. आगलावे, प्रदिप., (२०००), शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र, विद्याप्रकाशन, पुणे.
२. बापट, भा. गो., (१९८८), शैक्षणिक संशोधन, नुतन प्रकाशन, पुणे.
३. भांडारकर, के. म., (१९९८), सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, नुतन प्रकाशन, पुणे.
४. भिंताडे, वि.रा., (१९८९), शैक्षणिक संशोधन पध्दती,नुतन प्रकाशन, पुणे.
५. करंदीकर, सुरेश., (१९९७), शैक्षणिक संशोधन, फडके प्रकाशन, पुणे.
६. दांडेकर, वा.ना., (२००४), शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र, विद्या प्रकाशन, पुणे.

७. दुनाखे, अरविंद रघुनाथ., (१९९७), प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, नित्यनुतन प्रकाशन, पुणे.
८. टेकाडे, आर. व्ही. पाईकराव विजयकुमार., (२००६),प्राथमिक स्तरावरील शिक्षण वा शिक्षकांची कार्य, य.च.म.मु. विद्यापिठ, नाशीक.